म. ग्रं. सं. ठाणे
य काव्य
नं. १४५८



# गीत-सुगंध

REFBK-0011264
REFBK-0011264

सुधांशु

५०१९९५०

मधुर-गीत-माला भाग १ ला

# गीत-सुगन्ध

( भक्तिभावगीतसंग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५३८२ विः ३.१०४
क्रमांक ११२५० नों: दि: २३।३।५०

## —सुधांशु—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ११२६४
ठाणे (स्थळ प्रत)

मूल्य पन्नास नये पैसे

REFBK-0011264
REFBK-0011264

भारतीय नभोवाणीच्या सौजन्यानें

* सर्व हक्क लेखकाधीन

* प्रकाशक–

पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २.

* मुद्रक–

वि. श्री. जोगळेकर
संजीवन मुद्रणालय
६९३ बुधवार, पुणें २.

* प्रथमावृत्ति

मकर संक्रमण
१४ जानेवारी १९६०

## भाव-बोल—

माझ्या गीतांचें मराठी रसिकतेनें केवढें कौतुक केलें ! विनम्र-भावानें या रसिकतेला मंगल प्रणाम.

आज कृतज्ञभावानें माझें अंतःकरण भारावलें आहे. अनेक गायकांच्या–रासिकांच्या–मित्रांच्या छाया पुढून सरकत आहेत.

माझ्या गीतांचे निष्ठावंत गायक—श्री. आर एन्. पराडकर, पुणें केंद्रावरील माझ्या गीतांचे पहिले गायक—श्री. दत्ता वाळवेकर, विठ्ठलराव घोंपाटे, हळव्या अंतःकरणाचे गायक मित्र श्री. बाळ कारंजकर यांचें ऋण फेडण्याची मनीषा कशी धरूं ?

सर्वश्री गजाननराव वाटवे, बबनराव नावडीकर, मा. गिरीधर, वसन्तराव पवार, प्रभाकर जोग, दशरथ पुजारी, विठ्ठल शिंदे, लोवलेकर, सौ. माणिक वर्मा, सौ. कुमुदिनी पेडणेकर, सौ. मंगला पराडकर, सौ.आशा शिंत्रे, सौ. सुमन कल्याणपूर, सौ. मधुबाला चावला, जानकी अय्यर, मालती पांडे यांनीं माझ्या गीतांना स्वरांचा सुंदर साज चढविला. ती देखणी केली. या सर्वांबद्दल माझें मनांत कृतज्ञ भाव आहे. शिवाय श्री. ना. र. मारुलकरबुवा, अप्पासाहेब इनामदार, लेखकमित्र म. भा. भोसले, माझ्या साहित्याचे एक सहाय्यक शंकरराव परळकर, ग्रामोफोन कंपनीचे जी एन्.जोशी, कामेरकर, रेळे , सोहनी, गीतप्रकाशक ग. का. रायकर, टिल्लू – यांचें प्रेमळ प्रोत्साहन ! या सर्वांचें ऋण डोई वागविण्यांतच मला भूषण वाटते.

माझे प्रकाशक मित्र श्री.पंडितराव कुलकर्णी यांनीं मोठया तत्परतेनें माझ्या गीतपुष्पांना सुंदर कोंदण दिलें.

भारतीय नभोवाणी तर माझ्या गीतांची प्रेरक शक्ति. तिला कसा विसरूं !

शेवटीं मराठी रसिकतेला विनवितो—

'तव कृपेस कुठली जातकुळीं !' ही सेवा मानून घे.

सुधांशु–सदन
औदुंबर ( द. सातारा)
१४ जानेवारी १९६०

सुधांशु

माझ्या गीतांची पहिली गायिका

**सौ. प्रमिला हीस अर्पण**

## सुधांशु–साहित्य

| | | |
|---|---|---|
| १ | कौमुदी | ( काव्य ) |
| २ | विजयिनी | ( काव्य ) |
| ३ | जलवंती | ( काव्य ) |
| ४ | उगवते तारे | (प्रा. काव्य) |
| ५ | दत्तजन्म | (संगीतिका) |
| ६ | गीतसुगंध | (भावगीत) |
| ७ | ने. स्वातंत्र्यसंग्राम | ( पोवाडा ) |
| ८ | खडकांतील झरे | ( कथा ) |
| ९ | चतुरादेवी | (बालकथा) |
| १० | सुभाषकथा | (बालकथा) |

卐

**सुधांशु, ( ह. न. जोशी )**

सुधांशु-सदन, औदुंबर, जि. द.सातारा

## दत्तदिगंबर दैवत माझें

दत्त दिगंबर दैवत माझें
हृदयीं माझ्या नित्य विराजे !

अनुसूयेचें सत्व आगळें
तिन्ही देवही झालीं बाळें
त्रैमूर्ती अवतार मनोहर, दीनोद्धारक त्रिभुवनीं गाजे १

तीन शिरें, कर सहा शोभती
हास्य मधुर शुभ वदनावरती
जटाजूट शिरीं, पायिं खडावा, भस्मविलेपित कांती साजे २

पाहुनि प्रेमळ सुंदर मूर्ती
आनंदाचे आंसू झरती
सारे सात्विक भाव उमलती, हळुं हळुं सरतें मीपण माझें ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२६८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# गुरुदत्त पाहिलें कृष्णातिरीं

गुरुदत्त पाहिले कृष्णातिरीं
शतदीप उजळले माझ्या उरीं !

चरण क्षाळिते कृष्णामाई
छत्र, तरूंची शीतल राई
गोड आरती खगगण गाती, भुलली स्वर्गपुरी १

यतिवेषें गुरूमूर्ति शोभली
अपार करुणा हृदयीं भरली
सूर्यचंद्रमा नयनीं, वदनीं शांतिसुमें साजिरी २

प्रभुरायाची शुभद पाउलें
सेवाया सुर भूवर आले
माझ्या नयनामधुनी झरती प्रेमाश्रूंच्या सरी ३

*

# दत्तगुरू सुखधाम

दत्तगुरू सुखधाम
माझा – दत्तगुरू सुखधाम !

मेघ दयेचा अत्रीनंदन
तृषित चातक येता धाउन
फुलविल त्याचें विकलित जीवन
पतिता जो आराम १

विनम्र भावें जे जन भजती
सिंधु सुखाचा त्या गुरूमूर्ती
त्रिविधताप अविलंबें हरती
घेतां मंगलनाम २

*

## श्रीरामाचें वेड जिवाला

श्रीरामाचें वेड जिवाला
शरण सदा मी रामपदाला !

श्यामल कांती, सुंदर मूर्ती
शीतलतेजें नेत्र झळकती
बाहुभूषणें लखलख करिती, रुळती कंठीं मौक्तिकमाला १

शांत धीर गंभीर रघुपती
चापबाणधर, विमल सुकीर्ती
सौंदर्याची केवळ प्रतिमा, सती जानकी वामांगाला २

रघुरायाचें रूप मनोहर
रघुरायाचें नामहि सुंदर
रंगुनि जावे रामस्वरूपीं, विसरुनि जावे या विश्वाला ३

*

## आले स्वयंवराला राम

आले स्वयंवराला राम
मनोहर कोमल मेघश्याम !

शांत धीर ती मूर्ति गोजिरी
बालरूप पीतांबरधारी
चारुवदन तें लाजवि मदना, कमलनयन अभिराम १

निर्वीरच कां झाली अवनी –
जनक नृपाचे बोल ऐकुनी
उठले राघव; बालरवी जणुं, सामर्थ्याचे धाम २

उचलुनि धनु, पण जिंकी रघुविर
जनकसुतेचें फुललें अंतर
रोमांचांनीं नटली काया, पुरले इच्छित काम ३

*

## सखे ग सांगु कुणाला कशी

सखे ग सांगु कुणाला कशी
वरियले रामाला मानसी !

कशाला मांडियला हा पण
कसा पण जिंकिल रघुनंदन
तयाची काया नाजुकशी १

पातले थोर थोर नृपवर
कुणी कां लाविल धनुला शर
जाळिते नाजुक चिंता अशी २

तशांतहि रावण आला इथें
मागणें अंबेला मागतें
पडावा दुष्ट सभेंतच फशी ३

रघूत्तम भरला माझ्या मनीं
मिळावी चंद्राला रोहिणी
पुरावी इच्छा ही गोडशी ४

*

## राघवा जपून चाला जरा

राघवा जपून चाला जरा
कुसुम पाउलें जनक सुतेची दुखतिल ना प्रभुवरा !

मृदु पायघड्याविण पडलें ना पाउल
स्वप्निंही जिला ना दुःखाची चाहुल
असे जानकी तुमच्यासंगें शीलवती सुंदरा १

सेवावा ज्यांनी चंद्रकिरण कोंवळा
त्या रवितापाच्या साहतील कां झळा ?
मृदुल रेशमी कोमल काया सुकेल ना भास्करा २

हे वनमार्गांनो जरा मृदुलता वरा
हे तरूलतांनो हिजवर छाया धरा
हिच्या शिरावर उधळा शीतल सुमनांचा फुलवरा ३

चालली पतीसह वनवासाला सती
स्वर्गांतुन खालीं सुर आंसू ढाळिती
कणाकणांतुन उच्छ्वासांनीं गहिवरली ही धरा ४

*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३८२ विः काव्य
क्रमांक १४५६ नोंः दिः २३।३।६०

# ध्यास हा जिवाला

ध्यास हा जिवाला   पंढरीसी जाऊं
वैकुंठीचा राणा   डोळेभरी पाहू !

पुंडलिका भेटी परब्रम्ह आलें
भक्तांचिया काजा विटेवरी ठेलें
मधुरनाम त्या माधवाचें गाऊं   १

साजिरें तें रूप पुतळा प्रेमाचा
कासे पीतांबर टिळा कस्तुरीचा
सावळी विठाई अंतरांत ध्याऊं   २

तुक्याचे अभंग गाई चंद्रभागा
साथ देई वारा भजनाच्या रंगा
रंग तो लुटाया वारकरी होऊं !   ३

*

## पंढरीच्या वाटेवरी

पंढरीच्या वाटेवरी  कुणी सोबतीला नाहीं
पुढें चालले विठ्ठल  चाले मागुनी जनाई !

भर दुपारच्या वेळीं
सूर्य तापतो आभाळीं
शिरीं सावली मायेची  नामघोष पाणपोई  १

वाट पंढरीची छान
मोडिली कुण्या पाप्यानं
विठू सावरितो तोल  जनाबाई हात देई  २

माझ्या विठूची पंढरी
घुमे नामाच्या गजरी
विसरतां देहभान  गाई जनाई अंगाई  ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99268

## माझा देव उभा विटेवरी

माझा देव उभा विटेवरी
उभा विटेवरी
माझें वैकुंठ भीमातिरीं !

माझा देव सावळा हरी
कर ठेवुनि कमरेवरी
दासांचे पुरवितो कोड  करी चाकरी  १

कासें कशिला पितांबर
शिरीं मुगुट खुलें सुन्दर
कंठांत वैजयंती माळ  हंसें मनहारी  २

वाळवंटी भजन रंगतें
भवताप व्यथा भंगते
हळुं हळूं खुलविते सूर  हृदय बासरी  ३

*

## भीमाईच्या काठीं

भीमाईच्या काठीं विठाई सावळी
रंगली भक्तांच्या भजन कल्लोळीं !

राबली मळ्यांत सावत्या संगती
गोऱ्या कुंभाराची मळीयली माती
नामयाच्या संगें जेवली राऊळी ! १

जनाईस लागे दळाया दळण
दामाजिचेसाठीं आलें धेडपण
आवडते भक्ती तुकोबाची भोळी २

बाळ मी, शिरावे– आईच्या कुशींत
तिनें अमृताचा फिरवावा हात
विरून मी जावें मायेच्या सुकाळीं ३

*

# विठ्ठल नामाचा छंद मला जडे

विठ्ठल नामाचा छंद मला जडे
नामसुधेचे भरितें मी घडे !

करितांना घरीं कामधंदा
मन घेई नामाचिया छंदा
नामरंगी जीव माझा बुडें १

घरीं दारीं प्रभूनामीं रंगतें
नामामृतचवी गोड चाखितें
वेड लावी विठ्ठल राजा गडे २

मुखीं नाम हृदयीं विठु सावळा
प्रेमानंद नामाचा बाई आगळा
आत्मसुखाची पायरी मी चढे ३

नामामुळें मला इथें पंढरी
चंद्रभागा वाहे माझ्या ओसरीं
वैकुंठ हें माझें ग झोपडें ४

*

## चालतें पंढरिची मी वाट

चालतें पंढरिची मी वाट
चढे मी कैवल्याचा घाट !

आप्तसोयरी सोडुन सारी
पंढरिची मी धरिली वारी
अंतरीं भक्तिउमाळा दाट १

आज अशी निःसंग जाहलें
शालिनतेचे बंध तोडिले
तोडिली जनरूढीची गांठ २

विठुरायाचें वेड लागलें
भजनीं त्याच्या रंगुन गेलें
उसळली आत्मसुखाची लाट ३

अतां विठूविण न दिसे कांहीं
ध्यास जिवाला दुसरा नाहीं
सुखानें भरलें काठोकांठ ४

*

# रुद्राक्षांच्या नकोत माळा

रुद्राक्षांच्या नकोत माळा नको त्रिकाळीं स्नान् !
भुकेला भक्तीला भगवान् !

सेवून कण्या तो विदुराचा सौंगडी
त्या सुदाम्याचिया पोह्याची आवडी
भावभक्तिचें तया आवडें एकच तुळशी पान्
भुकेला भक्तीला भगवान् १

तो जेवूं घालितो नामदेव विठ्ठला
दामाजीसाठीं धेड हरी जाहला
जनीसंगतीं दळितो त्याला भक्तांचा अभिमान्
भुकेला भक्तीला भगवान् २

एकनाथ सदनी विठ्ठल भरितो घडे
तुकयाची भोळी भक्ती त्या आवडे
वारकऱ्यासह नाचूं लागे भजनांतहि भगवान्
भुकेला भक्तीला भगवान् ३

*

# ध्रुवबाळ निघाला वनीं

ध्रुवबाळ निघाला वनी
राजतनय चालला घासही सोन्याचा सोडुनी !

अंकिही पित्याच्या सत्ता नाहीं जिथें
सापत्न माउली वैरानें पाहते
या मानधनाला कसें साहवेल तें
सत्तेचें पद मिळेल कोठें एकच चिंता मनीं १

पुरवील कामना एक जगन्नायक
त्या शोधायाला निघे बालसाधक
खुपतात खडे पदीं, सुकुनी गेलें मुख
कळी कोवळी अळूं लागली तीव्र तपाराधनीं २

या बालमुनीची पाहुनिया साधना
करुणेचा फुटला पान्हा नारायणा
माउली धावली विश्वाची त्या क्षणा
दिलें अढळपद धन्य जाहला ध्रुव बालक तो गुणी ३

*

## मी साधी भोळी पुष्पकळी

मी साधी भोळी पुष्पकळी
शोभेन कशी तव करकमळीं !

तूं सौंदर्याचा राजा
नच रंग मनोहर माझा
सावळीच मी रे वनमाळी १

नच माझें रूप विलासी
भुलवाया तव हृदयासी
नच गंध गोजिरा मजजवळीं २

मज नको धराया हातीं
मज नको रुळाया कंठीं
राहीन तुझ्या मी पदकमळीं ३

प्रभु जीवन माझें हीन
परि तुझीच मी म्हणवीन
तव कृपेस कुठली जातकुळी ४

*

## कसे मी सोडूं पाय तुझे

कसे मी सोडूं पाय तुझे ?
जगताला मी मुकलें माझें तुजवरती ओझें !

ही हीनकुळीची नार
मज कोण जवळ करणार
सरतां वैभव सरले बांधव नातेंही लाजे १

मी बसतां वठतीं झाडें
मजसाठीं बंद कवाडें
स्पर्शे माझ्या निसर्ग मिटतो प्रेमळ दरवाजे २

तूं कारुण्याचा सिंधू
तूं दीनांचा रे बंधू
तूंच तार वा तूंच मार मज जे तुजला साजे ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११२८४

## प्रभू मी तुळशीचें रे पान

प्रभू मी तुळशीचें रे पान्
करीन माझें जीवनधन मीं तुझिया चरणीं दान् !

दूर्वादल हें जीवन माझें
क्षुद्र म्हणुनि मी जगास लाजे
तुझिया पायीं वाहीन काया दे अितुका तरि मान् १

बिल्वपत्र रे मी अिवलेसें
मज उपहासें त्रिभुवन हासे
तुझियासाठीं जीवन माझें, माझा तुज अभिमान् २

दीनपणें मी असें असावें
विनम्र भावें तुला भजावें
नको अधिक रे पायधूळ मज तव पदतलिची मान् ३

*

# हरिनाम सुधारस सेवूंया

हरिनाम सुधारस सेवूंया
हरिभजनी रंगुन नाचूया !

हरिचे मंगल गुण जे गातीं
मोहबंधनें त्यांची तुटतीं
भावभुकेली श्रीहरिमूर्ती, हृदयसुमन त्या वाहूंया १

मुनिजनरंजन, खलरिपुभंजन
चिरसुखसाधन, हरिसंकीर्तन
दया हरीची गंगा पावन, न्हाउन पावन होऊंया २

हरिपदीं रतले ते जन तरले
रुतले ते जे हरिला मुकले
पळ पळ सरतें जीवन अपुलें त्वरित सार्थकीं लावूया ३

*

# जगीं नाहीं कोणि कुणाचा

जगीं नाहीं कोणि कुणाचा
जो तो अपुल्या दैवाचा !

सुत कांता भगिनी भ्राते
ते सारे अपुल्या पुरते
नच समयीं कुणि कामाचा १

वैभवीं सकल जमताती
तें सरतां सोडुनि जाती
सोबती स्वजन सौख्याचा २

जगीं जैसें कर्म करावें
सुखदुःख तसें भोगावें
हा न्याय असे सृष्टीचा ३

*

## जो जो बाळा शाममोहना

जो जो बाळा शाममोहना
नंदाच्या लाडक्या नंदना !

रूप तुझें कमनीय कोवळें
प्राजक्तासम मृदुता खेळे
तुला नभानें रंग अर्पिला गोजिरवाणा १

उषा हासते शामलवदनीं
नयनिं हासतीं कमळें फुलुनी
कांतीवरुनी ओवाळावे हसऱ्या अरुणा २

आदिपुरुष तूं ब्रम्ह सनातन
येसि गोकुळीं बालक होउन
माय यशोदा हालविते रे तुझा पाळणा ३

*

## या मुरलीनें कौतुक केलें

या मुरलीनें कौतुक केलें
गोकुळाला वेड लाविलें !

वेड लाविलें श्रीकृष्णाला
हिजविण क्षणही न सुचे त्याला
सतत आपुल्या अधरीं धरिलें १

हिच्या मधुर मंजूळ सुरांतुन
अमरपुरीचें डुललें नंदन
यमुनेचें जल चाल विसरलें २

अधरसुधा प्राशून हरीची
पावन झाली तनु मुरलीची
'भाग्यवती मी' मुरली बोले ! ३

*

# कालिंदीकाठीं

कालिंदीकाठीं शाम वाजवी पावा
ही भुलली राधा कुणी हिला समजावा !

बासरी ऐकतां विसरुन धारापाणी
जाहली बावरी भरल्याघरची राणी
सोडुनी काम घेतसे किनारी धावा १

घाईंत कुंकुही लावायास विसरली
विसकटली वेणी पदर घसरला खालीं
ही लहान कां – हिज विचार कांहीं असावा २

हिज दुपार नाही तिन्हीसांजही नाहीं
ऐकते कशाला – म्हणोत कोणी कांहीं
हिज खटचाळ हरिचा कसा कळावा कावा! ३

*

## कृष्ण तर गोकुळांत नाहीं

कृष्ण तर गोकुळांत नाहीं
कशाला नटली राधा ही !

नेसली साडी चंदेरी
भूषणें ल्याली मनहारी
घातलें नयनीं काजळही १

कंकणें रत्नजडित हातीं
चालणें सुन्दर हंसगती
नूपुरें रुणझुणतीं पायीं २

मनोहर केसांची रचना
सुहास्यही शोभविते वदना
सुकांती लाजवि रतिलाही ३

हवा तो अम्हालाच कृष्ण
हिला तर चराचरी कृष्ण
कृष्णमय राधिकाच होई ४

*

## राधिका धुंदीत चाले

राधिका धुंदींत चाले
राधिका गुंजत बोले !

राधा अंजिरी साडी ल्याली
रंग गुलाबी राधेच्या गाली
काळी नागीण पाठीशीं डोले १

पायिं पैंजण तालांत वाजे
अंगाअंगांत यौवन साजे
देहलतेला नाजुक झोले २

आज आगळी गौळण राधा
झाली राधेला मोहन बाधा
प्रीत डोळयांत हिच्या हिंदोले ३

*

# राधिके ऐक जरा बाई

राधिके ऐक जरा बाई
हरीचा संग बरा नाहीं !

हरी हा थोरांचा ग बाळ
तुझ्यावर येइल नसता आळ
तुझी नच इतुकी पुण्याई १

पुरवितो आज तुझें कोड
उद्यां तो दुसरीला गोड
छंद त्या नित्य नवा बाई २

तयाच्या लागुं नको नादी
चोर तो तूं अपुली साधी
अजुनिही सावध तूं होई ३

वयाचें ठेव ज़रा भान
दे जरा जगाकडे कान
त्यांत तूं सासुरवाशिणही ४

*

# लपून बसली राधा गौळण

लपून बसली राधा गौळण
वेडा होउन शोधी मोहन !

इथें धुंडितो तिथें धुंडितो
न मिळे राधा व्यथित हिंडतो
लपल्या जागीं हसते राधा श्रीकृष्णाला दुःखी पाहुन १

हाक मारितो राधा–राधा
लक्ष लावितो तो प्रतिसादा
निराश होउन अश्रु गाळितो थिजते कालिंदी तें पाहुन २

हळवें झालें मन राधेचें
बघवेना तें दुःख हरीचें
हळुच येउन नयन झाकिते, हरी नाचतो हर्षें न्हाउन ३

वेडी राधा वेडी राधा
फसवूं बघते जगदानंदा
अतर्क्य माया कुणा कळावी भक्तासाठीं रचितो मोहन ४

*

## आज आगळी राधा गौळण

आज आगळी राधा गौळण
अंगांगावर खुलला मोहन !

नयनिं सावळें रूप हरीचें
तेज मुखावर हरिवदनींचें
अधरीं हरिचें अमृतसिंचन १

देह हिचा पण हरिची कांती
हरिची मुरली राधे हातीं
कणाकणांतुन हरिचें स्पन्दन २

शब्दामधुनी हरिचें लाघव
स्पर्शामधुनी हरिचें मार्दव
हरिनामाचें हृदयीं गुंजन ३

गोरी राधा आज सावळी
हिच्यांत नटला तो वनमाळी
कृष्णराधिका एकच दर्शन ! ४

*

# प्रीत तुझिया अंतरींची

प्रीत तुझिया अंतरींची चित्र तूझें सांगतें
स्वप्न तुझिया संगतीचें प्रेमरंगें रेखितें
मी प्रेमरंगें रेखितें !

भाव नयनीं हासरे
मोहविती चित्तरे
लाजरी मी बावरे।
ओष्ठकलिका अर्धउघडी गोड कांहीं मागते
चित्र तूझें सांगतें १

मोहिनी गालीं खळी
कीं गुलाबी पाकळी
अमृताची अंजुळी
ती टिपाया पाकळ्यांनीं हळुंच खाली वाकतें
चित्र तूझें सांगतें २

तूं नको सांगू परी
जाणिलें मी अंतरीं
तूं खुषी माझ्यावरी
जाणुनी हें काय प्रतिमा ही तुझी रे हासते
चित्र तूझें सांगतें ३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम *२६३८२ वि: काव्य
क्रमांक १४५८ नों. दि. २३।३।५०

## कसा सूर्याचा रथ चालेना

कसा सूर्याचा रथ चालेना
गालीं संध्येच्या प्रीत बोलेना !

प्रगटतां सावळी निशा
माझ्या प्रीतीची हसेल उषा
सांगितली वेळ कधीं फुलेल मज कळेना १

मैना मनाची ही बोलकी
कशी बोलेना झाली मुकी
कुंठली गतिच मुळि पळांची नौका हलेना २

खुले बाई कळी संध्येची
आली थंड झुळुक पवनाची
अंगणांत चाहुल ओळखीची लाजतें मोहना ३

*

## अशाच वेळीं निळ्या जळावर

अशाच वेळीं निळ्या जळावर –
अशीच नौका डुले
मनांतिल गूज आपुल्या फुले !

असेंच होतें धुंद चांदणें
त्यांत मिसळलें मनिचें गाणें
त्या गाण्याच्या सुरासुरांतुन भाव प्रीतिचा खुले १

जरा बिलगुनी बसतां आपण
खुदखुदल्या तारका नभांतुन
चंद्रहि हसला खटचाळ, याला बघवेना चांगलें २

हळू चालली नौका पुढती
शांत जलावर तरंग उठती
त्यांत अपुल्या अंतरांतले गोड रंग मिसळले ३

त्या रंगांतुन त्या गूजांतुन
घडलें अपुलें मंगल मीलन
चांदरात झुलविते अजुनि त्या आठवणींचे झुले ४

*

## चंद्रा रे पाहूं नको

चंद्रा रे पाहूं नको
इथें चोरून राहूं नको !

घनदाट वडाच्या तळीं
प्रीतीची फुलतां कळी
कवडशातुनी वाकुनी –
मला भय हळुंच दावूं नको १

प्रियासवें गुपित रंगतें
तुला पाहून मी लाजतें
रोहिणीची शपथ रे तुला –
अशी दृष्ट प्रीतीला लावूं नको २

कसा गेला ढगाच्या आड्
आहे शपथेची यालाहि चाड्
तूं मीच इथं साजणा –
अतां दूर असा तूं राहूं नको ३

*

## बोलूं कशी तुझ्याशीं

बोलूं कशी तुझ्याशीं — मी वेल लाजरीची
छेडूं कशी सतार — मी मूक भावनांची !

झालें तुझी मनानें — हृदयीं तुझेंच गाणे
परि बोचते जिवाला — ही रीत रे जगाची १

मी धीट नेहमीं ना ! — मी बोलकीच मैना
कां आज मुग्धता ही — नकळे मनास जाची २

तूं चांद रोहिणी मी — तूं कृष्ण राधिका मी
मी झाकितें हळूंच — ही लाज रे उरींची ३

घे सावरून तोल — बोलून प्रेमबोल
हसवून तूंच गालीं — खुलवी कळी मनाची ४

*

## किती जागशील !

किती जागशील बाई
किती जागशील !
रोहिणिच्या संगें आतां चांदही कलेल !

तुला भूषवीत होती
धुंद यौवनाची कांती
कशा त्याच चांदराती पुन्हां हासतील १

मत्त लावणी प्रणयाची
छेडी तार उन्मादाची
मधुर सूर विरले फिरुनी कसे जोडिशील २

प्रेमगीत रंगे ओठीं
प्रेमरूप अवघी सृष्टी
प्रेमकुंज कैसा बाई – पुन्हा मोहरेल ३

सरे सुगंधाची छाया
उरे शिशिराची माया
कशी मोहरावी काया - उगा जळशील ४

*

## माझ्या मनांत विणितें नांव ग

माझ्या मनात विणितें नांव ग
कसं सांगू ? अमोल त्याचा भाव ग !

नांव त्यांचं नाजुक मोरपीस
छळितें तें मला ग लाजरीस
काळजांत नवखा गोड घात ग १

माझ्या मनांत लाखदां मी घोकतें
ओठांतून फुटेना बाई गूज तें
माझा भारीच लाजरा स्वभाव ग २

त्यांच्या नांवांत आगळा आनंद ग
वेड लावी हा पुनवेचा चांद ग
कशी दावूं मोलाची माझी ठेव ग ३

*

# मला ती आवडते झोपडी

मला ती आवडते झोपडी
आठवणींची गर्भरेशमी उलगडतें मी घडी !

कृष्णाकाठीं घरकुलांत या
नादी लागुन सखया तुझिया
हळुंच लागलें मी चाखाया
प्रीतीची गोडी १

स्वच्छ हासरें समोर अंगण
पारिजात करी सुगंध पखरण
तळीं तयाच्या तुजला पाहुन
झालें मी वेडी २

ओळख झाली झाल्या भेटी
खुलें चांदणें हंसऱ्या ओठीं
रात्र निवळली वदतां गोष्टी
उलगडतां कोडीं ३

कोडीं सुटलीं सुटली शप्पथ
आवडिची मज लाभे संगत
प्रेमजलावर अतां तरंगत
अपुली रे होडी ४

REFBK-0011264
REFBK-0011264
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३८२ वि: काव्य
क्रमांक १४५८ नों: दि: २३/३/६०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे (स्थळ प्रत) वा. क्र. ११२६४